मला अशक्यच होतें. म्हणून मी स्वस्थ राहिलों. त्यावर मी पुष्कळदां शिरडीस गेलों प्रत्येक वेळीं श्रीनें वाडा बांधण्याबद्दल मला सांगावें. इ० स० १९१२ च्या नाताळांत मी शिरडीस गेलों त्यावेळीं कै० वा० रा० रा० नानासाहेब चांदोरकर व श्री० ह० हरी सीताराम दीक्षीत वगैरे बरीच मंडळी शिरडीस श्रीदर्शन घेतल्यावर श्री म्हणाले "हा भाऊ मी सांगतो तें ऐकत नाही. माणूस बोलत का हैवान बोलत." तेव्हां नानासाहेबांनीं विचारलें काय बाबांनीं तुम्हाला काय सांगितलें आहे. त्यावेळीं मी त्यांना ह्या वाडयाबद्दल सविस्तर हकीगत सांगितली तेव्हां त्यांनीं श्री बाबांस सांगितलें कीं हें काम त्यांच्या शक्तीच्या अगदीं बाहेरचें आहे, तेव्हां त्यांनीं काय करावें हें आम्हाला सांगा आपली आज्ञा असल्यास आम्ही त्याला वाडा बांधून देतों. श्री म्हणाले कीं नाना माझा भाऊ अगदीं वेडा आहे. त्याला लोकांनी फार तळून काढलें आहे. तरी तो कोणाला अबोचे अरे म्हणत नाहीं. मी कोठवर पाहूं. माझ्या सरकारांत त्याचा पैका पुष्कळ आहे तो मी त्याला देणार आहे. हा ऐकत नाहीं. तरीं त्यांनीं कोणाजवळ मागूं नये. मीच त्याला देईन. त्यांनीं माझेंच ऐकावें. तरीं देखील मी स्वस्त बसलों कारण इलाज नाहीं त्यावर पुन्हा मी श्रीच्या उरसास गेलों त्या वेळीं तर मला बरीच मेजवानी दिली ती मला हयातभर पुरणार आहे. मी व नांदेडकर गणपतराव वकील हे श्रीच्या पायरीपाशीं पहारा करीत असतां श्रीची तब्रियत एकाएकीं गेली. निदान एकाएकीं काय झालें असेल तें असो असें मला वाटलें. त्यावेळीं श्रीच्या उरसास सुमारें २०००० लोक असावे असा माझा अंदाज होता कारण शिवेच्या ओढयापलीकडे व राहत्याच्या बाजूलाही पहिल्या ओढयापलीकडेपर्यंत माणसें गच्च होतीं. थाळी फेकल्यास खालीं पडलीं नसती व ही सर्वत्र मंडळी श्रीच्या दर्शनाची अपेक्षा करीत होती. त्या वेळीं आम्ही थोडथोडी मंडळी दर्शनास जाऊं देत असूं. माणसें जात येत होतींच असें असतांना श्रीनें एकाएकीं नरसिंह रुप धारण करुन ते जे उठले ते माझ्या जवळ येऊन माझ्या आंगावर माणसें घालतो मला मशिदींत बसू देत नाहीं व चावडींतही बसू देत नाहीं असें म्हणून माझें नाक धरुन व दुसरे

हातांत सटका घेऊन मला हातानें लोटीत व तोडानें म्हणत कीं काढ माणसें बाहेर व मी हैवांन आहे का माणूस आहे तें तुला दाखवितों. " ह्या प्रमाणें आम्ही माणसें बाहेर घालवीत होतों व तीं पळण्यास लागलीं होतीं परंतु माझ्या पाठीमागची गर्दी कमी होईपर्यंत मला चुलीपाशीं आणलें व तेथून विटकारी उचलून मला शिव्यांच्या ( आशिर्वाद ) पुष्पवृष्टीची सुरवात केली व माझ्या पाठीमागें वेशीपर्यंत धांवत आले मी पळूं लागलों तों चुलीजवळ भिंतीपाशीं उभे राहून अंदु वाण्याच्या दरवाजावर दगड फेंकू लागले मला तोंडानें म्हणाले " तूं पळतोस कुठें तुला पळण्यासाठीं आणला नाहीं तुला ह्या माझ्या मशिदींत माझ्या हातानें गाडीन. पाणी मागूं द्यायचा नाहीं याद राख. मी तुला सोडितों काय ?" दुसरे दिवशीं पुन्हां नेहमी प्रमाणें आम्ही पायरी पाशीं उभे राहून मंडळीचीं व्यवस्था करीत होतों. त्या वेळीं श्री आनंदीत होतें पण पुढें त्या संध्याकाळीं पुन्हा मजवर रागावलेत ते असेकीं, मी व ह. अ. पंडीत असे आम्ही दोघे इसम घांटेकरितां नेलेले तिचें ब्राकेट बसविण्याकरितां आम्ही दोघे जण आढयावर उभे राहून पूर्वी घातलेलीं पहार काढून तें बळवित होतों त्या वेळीं श्रीची संध्याकाळची फेरी होऊन ते परत येत होते. त्या वेळीं बाहेरील मंडळीनें घांटबांधलेला दोर सोडून श्री मारतील म्हणून ते पळाले. आम्ही दोघेजणच वर तें घांटेचें वजन सांभाळून राहिलों होतों. परंतु तें वजन फारच असल्याकारणानें भार सोसणें अगदीं असह्य झालें होतें. तथापि आमचा नाइलाज होता. सोडतों तर दोघेहीं मरतों करितां मोठ्या काळजींत मी श्रीचें ध्यान करित होतों. व आतां तुम्ही सांभाळा म्हणून धांवा केला इतक्यांत श्री पुढें चावडी पर्यंत न जातां एकदम आंत शिरले व तेथें जवळ येऊन खांबास हात धरून ' पोरें मरतात " असें म्हणून वर पाहूं लागलें व या पळता कशाला पोरें मरतात तरीं देखील कोणी जलदीनें येत नाहीं असें म्हणाले मग श्रीनें काय केलें तें त्यांचें ते जाणोत परंतु आम्हांला दोघांनाहीं तो ब्राकेटचा दांडा घालतां येऊन मग अमच्या वरचा भार अगदीं नाहींसा झाला. नंतर त्याची चूक वगैर घालून आम्ही स्वस्थ झालों तरीं देखील श्री तेथेंच एक सारखेच

आमच्याकडेस पहात होते. नंतर आम्हाला फारच भीती वाटूं लागली कीं जर खालीं उतरलों तर श्री मारतील परंतु वरही उभें रहावत नव्हतें मग मनाचा निश्चयकरून घांट वाजवून खालीं उतरलों व लगेच श्रीच्या चरणीं नमस्कार घातला त्या वेळीं पहिल्यानें फारच रागावले व म्हणाले कीं आपण वेडयासारखें करुं नये. आतां दोघेही मेले असते. लोक पळाले चराट सोडून मी कुठवर तुला सांभाळूं आपना गरिबोंको वाली अल्लाहै अल्लासे कोई नहि. जा आतां वाडयांत बसून राय. कुठे जाऊं नकोस. वाडयांत गेलों तो चावडी झाल्यावर माझें डोकें दुखूं लागलें तें इतकें कीं माझ्यानें सोसवेना. मात्र आम्ही त्या दिवशीं श्री राधाकृष्ण आईस बाबा भाकरी देत असत त्यांतील कांहीं तुकडें राहिलेले ते साफ करुन कुटून त्यांत मिरपूड वगैरे घालून शिजवलें व थोडी चण्याची डाळ उसळ ही केली होती. ती चावडी आटोपल्यावर सर्वत्र मंडळीस चावडींत बसवून त्यांना तेथें खाण्यास देत होतों व त्यांतलाच नैवेद्य एका ताटांत घालून मी श्रीस तेथेंच चांवडींत ताट व पाण्याचा खुजा वगैरे घेऊन गेलों यावेळीं श्री मजवर फार रागावून मजवर नित्याची पुष्पवृष्टी करूं लागले तरी मी तें ताट वगैरे तसेंच न भितां श्रीच्या उशापाशीं आरशाजवळ ठेवलें त्यावर श्री "चेवलास माझी बरोबरी करतो याद राख तुला दावितों मी आखी रात निजूं देत नाहीं चावडीत बी बसून देत नाहीं व मशिदीत बो बसु देत नाहीं हे घेऊन जाय नाहीं तर मी फेंकून देईन" मी म्हणालों बाबा तो आपला नैवेद्य घ्या मग मंडळी घेतील. ते म्हणाले "तूं खाय मंडळीला खाऊं घाल मलो नको तरास देऊं." मी म्हणालों "बाबा आपण सकाळीं खालना" ते म्हणाले "आतां घेऊन जाय सकाळचे सकाळीं पाहून घेऊं मंडळीना सर्वांना घाल तूं खाय" मग मीं तें ताट नेऊन कपाटांत झांकून ठेवलें व सकाळीं श्री राधा कृष्णा आईनें तें न्याहारीच्या वेळीं मजकडून नेववलें तें मशिदींत नेलें कारण मला डोकेदुखीमुळें अगदीं चैन पडत नव्हतें. त्यावेळीं फकीर बाबा श्रीस म्हणाले मालिक पुरंदर तो रातमें बहुत रोनाय उसका सीर बहुत दुखता है कुच निगा करो

गरिब बिचारा आखा दीनरात मरतें है कुच धूप नय देखता रातकु सोता नै कुचना कुच कररेता. उसकू येतना बेमार करना नहीं" बाबा म्हणाले "उसकू बहुत उत आया है मेरे अंगली दालता मेरेकू चावडीने नय बेठने देतां मसीदमे नय बैठने देंता" फकीर बाबा म्हणाले तो बी मालिक बो आपने वासते सारा रात दीन मरता उसकू कुचबी दवा देव. बाबा म्हणाले अल्ला अच्छा करेगा. परंतु डोकें दुखणें राहिलें नाहीं. मग श्री० काकासाहेब माधवरावांना म्हणाले "माधवरात्र पुरंदऱ्यांच्या डोक्याला कांहीं औषध करा ते रात्रंदिवस एकसारखे रडतात हें बरें कां! त्यावेळीं माधवरावांनीं कांहीं औषध केलें तेव्हां तर डोक्यानें मला फारच जाच दिला व मी फारच वेमार झालों. इतक्यांत काकासाहेब श्री कडून परत आल्यावर मला विचारूं लागले कीं, काय कमी आहे कीं नाहीं? तेव्हां मी म्हणालों पहिल्यापेक्षां जास्त आहे. मग ते हांसत हांसत म्हणाले "आतां श्री बावाच काय करितील तें पाहूं चला थोडया वेंळानें आपण बाबाकडेस जाऊं. त्यांना विचार म्हणजे बरें होईल" त्याप्रमाणें आम्ही थोडया वेळानें श्रीकडेस गेलों त्यावेळीं त्यांनींही बाबांना सांगितलें, बापूसाहेब जोग व फकीरबावाही फार सांगूं लागले परंतु श्रीनें मला तेथें बसूं दिलें नाहीं. बसण्यास पहातों तो सटका ध्यावयास उठले व नित्याची पुष्पवृष्टीं करूं लागले मग मी तसाच श्री राधाकृष्णा आईकडेस गेलों. त्यांनाहीं फार वाईट वाटलें व त्या माझे डोकीवर कोलनवाटरच्या घडया वगैरे ठेऊं लागल्या परंतु आराम म्हणून कांहीं नाहीं. जास्तच होऊं लागलें मग तेथेंच रडत पडून राहिलों. तो तसाच सहा दिवस तेथेंच होतों परंतु तें माझें डोकें दुखणें कमी झालें नाहीं. पुढें मला घरीं जाण्यास परवानगी दिली व एक दो दिवसांनीं अल्ला अच्छा करेगा असें म्हणाले व उदी व वरदहस्त शिरी ठेवून वाडा लवकर बांध मला यावयाचें आहे असें म्हणाले. तसाच मी निघालों माझें डोकें दुखणें घर

पुढे अंक ४ पान १०८ (अपूर्ण)

# भक्तियोग.

चक्र पहिलें. ( मूळाधार )

हठयोगांतर्गत षट्चक्रांतील प्रथम चक्र मूळाधार चार पाकळ्यांनीं युक्त असें कल्पिलें आहे. त्याचप्रमाणें भक्तियोगांत मूळ आधार ( पहिलें चक्र ) मुमुक्षुत्व; इष्टदैवत सद्‌गुरु; चार श्लोकरूपी चार पाकळ्या ही कल्पना निरहंकार वृत्तीनें सद्‌गुरु हेंच आपलें अनन्यशरण्य या भावनेनें करुणा भाकणें ही भक्तीची प्रथम पायरी ]

पृथ्वीछंद.

किती विनवुं मी तरी अझुनि कां दया येईना। प्रभो तुजविणें मला जगति कोणीही अन्यना॥ पतीत खल मी परी, बघुं नको दयाळा उणें। आम्ही न जरि पापि, पावन तुला न कोणी म्हणे॥१॥

तुवां अमित पातक्यांस दिधली गती उत्तमा। मलाच मग कां उपक्षेसि प्रभो निवारी तमा॥ झणीं करिसि साचती प्रभु त्वदीय व्रीदावली। भवीं तुजसि आर्तबाहति, तयांस तूं माऊली॥ २॥

सदैव अपराध ते करितसें जरी लक्ष मी। प्रभो तुजविणें नसे जगतिं या कुणीही क्षमी॥ प्रहार धरणीस कां करि मदांधसा कोटिगा। पडेल; तरि मातृवत् धरणि त्या धरी पोटिंगा॥ ३॥

कधीं न कळतां बसे त्वदिय पादपद्मावरी। प्रभो मदिय चित्तभृंग तरि तूं कृपा ती करीं॥ क्षणैक नयनेंदुते वळवि सत्वरी त्यांकडे। तयीं मुकुलितां पदाब्ज मम चित्त तेथें अडे*॥ ४॥

चतुष्पटल भक्तियोगिं रचि मूळ आधारजें। सुचक्रातव तान्हुलें चरणि ठाव त्या देइजे॥

---

* आपण होऊन मन पायीं लागत नाहीं म्हणून प्रार्थना कीं कधीं चुकून हा मनोभ्रमर पदकमलावर बसेल तर तत्क्षणीं आपले नयनचंद्र त्यांकडे वळव; म्हणजे पद्म बंद होऊन भ्रमर आंतच अडून राहील. हा भावार्थ.

श्रीराम मुंबई सन १९१२.

शिर्डी येथील प्रसिद्ध अवलिया श्रीसाईबाबा यांस पाहण्याची मला अत्यंत उत्कट इच्छा झाली त्यावेळीं त्या समयाला अनुसरून श्रीप्रेरणेनें कांहीं कविता झाल्या. ह्या कविता त्यांचे भक्त श्रीयुत हरी सिताराम दीक्षीत सॉलिसिटर, मुंबई हे त्यावेळीं शिर्डीला होते असें ऐकल्यावरून त्यांचे नांवीं पाठविल्या त्या खालीं देत आहें.

## श्रीसद्गुरु कृष्णपादारविंदेभ्योनमः—

आर्या

स्फुरलें मानस येथें, वर्णाया गूण सांई बाबांचे ।
सद्गुरु कृष्ण कृपेनें, बोलो रसना सदैव ते वाचे ॥ १ ॥
वदवी श्रीकृष्ण गुरु, स्थिर चर व्यापक अखंड सुखकारी ।
सहकारी संसारीं, भवभय छेदक दयाब्धि अघहारी ॥ २ ॥
कृष्णार्पण होवो हे, सुखदायक गोड बोल बाळाचे ।
करद्वय जोडुनि विनती, पुरवो लडिवाळ कृष्ण बाळाचे ॥३॥

आर्या

सुखकर दर्शन देई सदय हृदय स्वामि साईबाबा हो ।
रुतलों या भवपंकीं, ने विलया साहि साई बाबा हो ॥ १ ॥

## पदें

पद १. ( राम स्मरावा राम या चा० )

सदय हृदय तूं दयाळ । सांइ बाप । सदय हृदय तूं दयाळ ॥ ध्रु० ॥ सिरडी ग्रामीं अवतरुनी करी, दीन भक्त प्रति पाळ ॥ सांइ बाप ॥ स० ॥ १ ॥ भक्तकाज कल्पद्रुम स्वामी, असती षड्रिपु काळ ॥ सां० ॥ स० ॥ २ ॥ नमती जे तुज अनन्य भावें, गळवुनि हंकृति व्याळ ॥ सा० ॥ स० ॥ ३ ॥ भक्त करिशि त्यां दर्शन मात्रें, स्वानुभवें तत्काळ ॥ सां० ॥ स० ॥ ४ ॥ राव रंक समसमान तुजला, अभेद तू

सर्वकाळ ॥ सां० ॥ स० ॥ ५ ॥ कृष्ण गुरु कृपें वचनां सद्या, कृष्ण हृदयीं तं अढळ ॥ सां० ॥ स० ॥ ६ ॥

पद २. ( अहारे कृष्णा मुकुंदा या चा० )

येइं येइं साईनाथा । दे दर्शन मज झडकरि आतां ॥ध्रु०॥ मन धांवलें चरणीं । म्हणनी स्मरिला तुज मी स्मरणीं ॥ पवित्र शिरडी तरणी । केलि महा अधिकारि महंता ॥ ये० ॥ १ ॥ भक्त तुझे गुण गाती । नानापरि जगीं नाचति ध्याती । ऐसी सकळिक ख्याती । जहाली क्षणमात्रें अवचीता ॥ ये० ॥ २ ॥ संत दयाळ तुम्ही हो । आर्त पुरवा मज दर्शन द्या हो । या या या या या हो । वाङ्केवीं तुज पाहिन आतां ॥ ये० ॥ ३ ॥

पद ३. ( रुचती कां तीर्थयात्रा या चा० )

प्रिय सांई येइं येइं मज भेटी देइं । वाङ्केवीं लुब्ध झालों पहा साईं हृदयीं हो ॥ ध्रु० ॥ हृदयीं तं सदा माझ्या भरलासी सांइ हों । निरिक्षीतां तूच सांईं क्षण पल पल दिससि हो ॥ प्रि० ॥ १ ॥ लडि-वाळ ऐक माझे त्वत्चरणा चुरिन हो । याहूनी काय माझ्या आहे या हातिं हो ॥ प्रि० ॥ २ ॥ लक्षिन मी मार्ग तूझा चातकवत् सांइ हो । गुरु कृष्णा आर्त पुरवीं या जन्मीं ऐशि हो ॥ प्रि० ॥ ३ ॥

पद ४. ( जाते कीं मम० याचा० )

भेटसि कधि तं सांई बाबा मज या मोहमयीं । त्वत्तनु कांति अवलोकाया आंस सदा हृदयीं ॥ ध्रु ॥ जरि मी तुझा असें दयाळा, तरि धांवनि येईं । क्षणभरि तरि तव तनु दावीं रे, येउनियां समयीं ॥ भे० ॥ १ ॥ भक्तकाम कल्पद्रुम तुम्हां, वदति ठायिं ठायीं । भेद अभेदा रहित तुम्हां ना, राव रंक कांहीं ॥ भे० ॥ २ ॥ साच असे ग्रह एकवार तुज, बघण्या त्या कार्यीं । येइं धांवनी या मोहमयीं, कृष्ण दास अन्वयीं ॥ भे० ॥ ३ ॥

पद ५. ( सुखकर कर साधूंचा संग या चा० )

धरिसि जरी सांइ चरणिं विश्वास ॥ ध्रु० ॥ मायामय हा भव-निधि तरुनी, मुरशिल तत्पदिं खास धृ० ॥ १ ॥ निदिध्यास अनु-दिनी धरिशि जरि, पावसि ब्रह्म पदास ॥ धृ० ॥ २ ॥ सांई अनुभव दुर्लभ बापा, जा बघ त्या वंशास ॥ धृ० ॥ ३ ॥ धांवत धांवत जा जा झडकरीं, घट्ट धरीं चरणास ॥ धृ ॥ ० ४ ॥ उत्तम हा नर जन्म नराचा, व्यर्थ करूं नको त्यास धृ० ॥ ५ ॥ कृष्ण कृपान्वित कृष्ण दिनाच्या दवडुं नको वचनास ॥ धृ० ॥ ६ ॥

पद ६. ( 'प्रभु अखंड सुखमय रामचि हा या' श्रीसद्गुरु बांदकर महाराजांच्या पदाच्या चालीवर )

प्रिय सांइ सुखद पद सोडुं नका । नका भुलूं आप्त सुत धन कनका ॥ ध्रु० ॥ सांई चरण करि हरण पाप निधि । लक्षि धरीं ही खूण । त्यजुनि विकल्पा जाण । सांई करिं आप्त सखा ॥ प्रि० १ ॥ साइं संत महंत नरारे । घे अनुभवें तूं प्रचित । हो येथें सावचित् । मोहु नको या मामा काका ॥ प्रि० ॥ २ ॥ दक्ष होउनि पदिं लक्ष लावितां । मोक्ष तूज प्रत्यक्ष । साक्षि लाविं तूं अक्ष । नको करुं वैखरी तूं ही फुका ॥ प्रि० ॥ ३ ॥

श्रीयुत दिक्षित यांसी—

अंजनीगीत—

प्रिय दीक्षित तुम्हीं कृपा करुनियां । कळवा मम बाबांसी विनया । मन्मानस बघण्या तव काया । आतुर बहु झालें ॥ १ ॥ जरि मी देखें सदैव तुजला । परि वेडें मन घेइं भ्रमाला । अक्ष धांवती बघण्या तुजला । या या झडकरिं हो ॥ २ ॥ तव चरणांवरि ठेविन माथा । सखया माझ्या सांई नाथा । मनिं आणुनियां साइं समर्था । या या झडकरिं हो ॥ ३ ॥ गोर गरिब दुर्बळ बहु येथें । पाहाती सांई

तम मार्गातें । कृपा करुनियां मुंबापुरितें । या या झडकरिं हो ॥ ४ ॥ हें जग तुमचें तुम्हीं जगताचे । न तुम्हां वारे आपपराचें ॥ कनवाळू तुम्हीं अखिल जगाचे । या या झडकरिं हो ॥ ५ ॥ प्रिय दीक्षित ही किंव मम कळवा । प्रिय सांईचें मन तुम्हीं वळवा । तळमळ माझ्या मतिची निववा । नमन तुम्हां पायीं ॥ ६ ॥

साकी—

अंतर माझें जरि तव चरणीं, मत्प्रिय साई नाथा । एकवार तरि येउनि येथें, भेट देइं अनाथां ॥ अंतर साक्षी तूं । मग कां येशि न धांवुनि तूं ॥ १ ॥

अनुष्टप—

लक्ष कोटी दोष माझे सांई बापा क्षमाकरा । दास मी विनवी तुझा जोडुनी उभया करा ॥ १ ॥

अनुष्टुप—

मी माझें लिहिणें नाहीं, दयाळा कृष्ण सद्गुरू । लिहिता लिहवीतां तूं दास हा तव किंकरू ॥ १ ॥

**श्रीमद्सद्गुरु कृष्णार्पणमस्तु.**

सदरील कविता शिर्डी मुकामीं पाठविल्या, त्याचें उत्तर श्री सांई बाबांनीं पाठविलें. हें उत्तर त्यांच्या एका भक्ताच्या हस्तांतून पाठविलें होतें, पण त्यांजकडून मला मिळालें नाहीं या बद्दल मला फार वाईट वाटलें ! त्या पत्रांत "**मी तुम्हाकडेसच आहे**" वगैरे मजकूर होता असें मागाहून मला श्रीयुत रेडकर यांच्याकडून समजलें. लगेंच दुसरे दिवशीं खालील स्वप्न झालें तें.

स्वप्न **श्रीसमर्थ वाग्देव महाराज** व **श्रीसमर्थ सांईबाबा** मुंबईंत आमचे घरीं झेंडयाजवळ ( श्रीसमर्थ वाग्देव महाराजांनीं स्थापन केलेला देव हाच झेंडा ) बसले आहेत मी बाहेरून घरांत आलों, त्यावेळीं मला पाहून

श्रीसमर्थ श्रीवाग्देव महाराज श्रीसाईबाबांस म्हणाले "हा वच्र थळी आला" व मला म्हणाले "थळी ह्यांस नमस्कार कर" श्री साईबाबा दोन्ही पाय जोडून गुढघे वर करून व गुढघ्यांभोंवती आपले दोन हात ठेऊन दोनही हातांची कातर घालून बसले होते. मी श्रीसाईबाबांस नमस्कार करावयास गेलों तेव्हां त्यांनीं आपले दोनही हात माझ्या मुखाकडे करून आपली जिव्हा जरा बाहेर काढून "**हें काय हें काय**" असें म्हणाले नंतर मी त्यांस परत नमस्कार करावयास गेलों तेव्हां दोनही पाय माझ्या सन्मुख करून हास्य मुखानें आनंदयुक्त मुद्रेनें मला प्रेमानें पददर्शन दिलें व कांहीं बोलले नाहीं. श्रीसमर्थ वाग्देव महाराज पाहत होते. नंतर जागृत झालों.

प्रत्यक्ष—हें स्वप्न रात्रौ सरासरी दोन वाजतां झालें होतें. कर्मधर्मानुसार त्या दिवशीं श्रीसमर्थ वाग्देव महाराजांचा मुकाम घरीं होता. झालेलें स्वप्न मी श्रीसमर्थांस त्याच वेळीं निवेदन केलें तेव्हा श्रीसमर्थ मला म्हणाले "**तूं कधीं त्यास पाहिले होतें काय ?**" मी उत्तर केलें त्यांस प्रत्यक्ष पाहिलें नाहीं परंतु त्यांचा फोटो मात्र पाहिला आहे. मला कांहीं दिवसांपूर्वीं एकाएकीं त्यांस पाहण्याची फारच प्रेमपूर्वक उत्कंठा झाली व त्यांच्या शिर्डींत चाललेल्या लीला माझ्या हृदयांत न पाहतांच येऊं लागल्या तेंव्हां मला अकस्मात् प्रेरणा झाल्यामुळें त्या समयाला अनुसरून कांहीं कविता झाल्या त्या लिहून श्रीयुत दीक्षित यांच्या नावीं पाठविल्या. त्याचें उत्तर त्यांनीं पाठविलें होतें तें माझ्या हातीं आलें नाहीं. त्या उत्तरांत "मी तुझ्याच जवळ आहे" असें लिहिलेलें समजलें हें ऐकून श्रीसमर्थ म्हणाले "**ते साईबाबाच खरे ते व मी एकच आहोंत. मीच तुला त्यांचें दर्शन देवविलें**"

संत भक्तांची चरणधूळ

**कृष्ण जगन्नाथ थळी.**

श्रीसंतसंघ पुस्तकमाला कार्याश्रम रामसेवक चित्रालय मुंबई नं. ४.

मुंबई पौष्य वद्य १४ शके १८४५.

श्रीसमर्थ श्रीवाग्देव महाराज श्रीसाईबाबांस म्हणाले "हा बघ थळी आला" व मला म्हणाले "थळी ह्यांस नमस्कार कर" श्री साईबाबा दोन्ही पाय जोडून गुढघे वर करून व गुढघ्यांभोंवती आपले दोन हात ठेऊन दोनही हातांची कातर घालून बसले होते. मी श्रीसाईबाबांस नमस्कार करावयास गेलों तेव्हां त्यांनीं आपले दोनही हात माझ्या मुखाकडे करून आपली जिव्हा जरा बाहेर काढून "हें काय हें काय" असें म्हणाले नंतर मी त्यांस परत नमस्कार करावयास गेलों तेव्हां दोनही पाय माझ्या सन्मुख करून हास्य मुखानें आनंदयुक्त मुद्रेनें मला प्रेमानें पददर्शन दिलें व कांहीं बोलले नाहीं. श्रीसमर्थ वाग्देव महाराज पाहत होते. नंतर जागृत झालों.

प्रत्यक्ष—हें स्वप्न रात्रौ सरासरी दोन वाजतां झालें होतें. कर्मधर्मानुसार त्या दिवशीं श्रीसमर्थ वाग्देव महाराजांचा मुकाम घरीं होता. झालेलें स्वप्न मी श्रीसमर्थांस त्याच वेळीं निवेदन केलें तेव्हा श्रीसमर्थ मला म्हणाले "**तूं कधीं त्यास पाहिले होतें काय?**" मी उत्तर केलें त्यांस प्रत्यक्ष पाहिलें नाहीं परंतु त्यांचा फोटो मात्र पाहिला आहे. मला कांहीं दिवसांपूर्वीं एकाएकीं त्यांस पाहण्याची फारच प्रेमपूर्वक उत्कंठा झाली व त्यांच्या शिर्डींत चाललेल्या लीला माझ्या हृदयांत न पाहतांच येऊं लागल्या तेंव्हां मला अकस्मात् प्रेरणा झाल्यामुळें त्या समयाला अनुसरून कांहीं कविता झाल्या त्या लिहून श्रीयुत दीक्षित यांच्या नावीं पाठविल्या. त्याचें उत्तर त्यांनीं पाठविलें होतें तें माझ्या हातीं आलें नाहीं. त्या उत्तरांत "मी तुझ्याच जवळ आहे" असें लिहिलेलें समजलें हें ऐकून श्रीसमर्थ म्हणाले "**तें साईबाबाच खरे ते व मी एकच आहोंत. मीच तुला त्यांचें दर्शन देवविलें**"

संत भक्तांची चरणधूळ

**कृष्ण जगन्नाथ थळी.**

श्रीसंतसंघ पुस्तकमाला कार्याश्रम रामसेवक चित्रालय मुंबई नं. ४.

मुंबई पौष्य वद्य १४ शके १८४५.

305

# अध्याय १८ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरुसाईनाथायनमः ॥

जयसद्गुरो परम नित्या । जयसद्गुरो ब्रह्मसत्या ॥
अनुभवें दाविसी जगन्मिथ्या । माया नियंत्या जयजया ॥ १ ॥

जयजयाजी अनाद्यनंता । जयजयाजी द्वंद्वातीता ॥
जयजयाजी विकाररहिता ॥ निजरूप बोधिता तूं एक ॥ २ ॥

सागरीं रिघाली करूं आंघोळी । परतेल काय सैंधवाची पुतळी ॥
हें तो न घडे कदाकाळीं । तुजजवळीही तैसेंच ॥ ३ ॥

वेदश्रुती हीं जयाविशीं । विवाद करिती अहर्निशी ॥
तें अलक्ष्य तूं बोटानें दाविशी । अप्रयासीं भक्तांसीं ॥ ४ ॥

आलाच दैवाचा योग जर का । पडला पुरेका तुझा गर्का ॥
मग हा आपुला वाहा परका । नाहीं या कुतर्का स्थान तैं ॥५॥

गताध्यायीं कथा पावन । ब्रह्म गुंडाळ्याचें आविष्करण ॥
ब्रह्मार्थियाचें लोभावरण । प्रतिबंध कारण वर्णिलें ॥ ६ ॥

---

१ नाशरहिता. २ निर्द्वंद्वा ३ निर्विकारा ४ स्वरूप ५ मिठाची बाहुली ६ वेढा.

आतां मदनुग्रह कथा । श्रवण कीजे आदरें श्रोतां ॥
अनुभवा येईल तुमचिया चित्ता । मार्ग दर्शकता बाबांची ॥७॥
ही ही आहे गोड वार्ता । ती मी कथितों यथार्थता ॥
श्रोतां आपुलालिया स्वार्था । स्वस्थ चित्ता परिसावी ॥ ८ ॥
असतां श्रवणार्थीं सादर । वक्त्यास उल्हास आणि आदर ॥
हृदया फुटे प्रेम पाझर ॥ आनंद निर्भर उभयतां ॥ ९ ॥
न करितां बुद्धिभेद तिळभर । जैसा जयाचा अधिकार ॥
तैसाच तयास मार्ग साचार । उपदेश पुरःसर दाविती ॥ १० ॥
ऐसें कितिएकांचे मतें । गुरूनें जें कथिलें ज्यातें ॥
कथितां नये तें इतरांतें । विफल होते गुरुवाणी ॥ ११ ॥
हेंतो केवळ काल्पनीक । नसतें स्तोम निरर्थक ॥
प्रत्यक्ष काय स्वप्नोक्त ही देख ॥ कथिती सत्बोधक सकळांतें ॥१२॥
मानाल जरी हें अप्रमाण । बुधकौशिक ऋषि प्रमाण ॥
रामरक्षा दीक्षेचें स्वप्न । केलें कथन सर्वत्रां ॥ १३ ॥
गुरु वर्षाकाळींचे घन । आवडी वर्षती स्वानंदजीवन ॥
तें काय ठेवावें कोंबून । यथेच्छ सेवून सेववावें ॥ १४ ॥
लेंकराची धरून हनुवटी । माय तयाच्या आरोग्यासाठीं ॥
मायाळूपणें पाजी गुटी । तीच हतवटी बाबांची ॥ १५ ॥
मार्ग तयांचा नव्हता गुप्त । कोण्या रीती कैसा अवचित ॥
निजभक्तांचा हेतु पुरवित । सावचित्त तें ऐका ॥ १६ ॥
धन्यधन्य सद्गुरू संगती ॥ कोणा वर्णवे तियेची महती ॥

---

१ मजवर झालेल्या अनुग्रहाची गोष्ट. २ जसी झाली तसी. ३ कथं नये. ४ स्वप्नांत सांगितलें. ५ दाटून.

आठवितां एकेक तयांच्या उक्ती। निजस्फूर्ति उचंबळे ॥ १७ ॥
प्रेमें करितां ईश्वरार्चन। गुरुसेवा गुरूपूजन ॥
होईल गुरुगम्य संपादन ॥ इतर साधन तें फोल ॥ १८ ॥
विक्षेप आणि आवरण ॥ तेणें हा भवमार्ग संकीर्ण ॥
गुरुवाक्य दीपकिरण। निर्विघ्न मार्गदर्शक ॥ १९ ॥
गुरु प्रत्यक्ष ईश्वर। ब्रह्मा विष्णू महेश्वर ॥
गुरूचि वस्तुतः परमेश्वर। ब्रह्म परात्पर गुरुराय ॥ २० ॥
गुरु जननी गुरु पिता। गुरु त्राता देव कोपतां ॥
गुरु कोपतां कोणी न त्राता। सदासर्वदा जाणावें ॥ २१ ॥
गुरु दर्शक प्रवृत्तीचा। तीर्थव्रत निवृत्तीचा ॥
धर्माधर्म विरक्तीचा। वेदश्रुतीचा प्रवक्ता ॥ २२ ॥
उघडूनि बुद्धीचे डोळे। संत दाविती निजरूप सोहळे ॥
पुरविती भक्तीचे डोहळे। अति कोवळे कारुणिक ॥ २३ ॥
तेणें विषय वासना मावळे। निद्रेंतही ज्ञानचि चावळे ॥
विवेक वैराग्य फळजावळें। कृपाबळें हातीं ये ॥ २४ ॥
जाहलिया सत्समागम ॥ संतसेवा संतप्रेम ॥
स्वयें भक्तकाम कल्पद्रुम। सर्व श्रम निवारी ॥ २५ ॥
सदा असावें सत्परायण ॥ कराव्या संत कथा श्रवण ॥
वंदावे संतांचे चरण। पापक्षालन होईल ॥ २६ ॥
लॉर्ड रे जैं इलाखाधिपती। क्राफर्डशाही घातली पालथी ॥
तत्कालीन एक प्रसिद्ध कीर्ती। लागले भक्तीस बाबांच्या ॥ २७ ॥

---

१ जुवळें.

हा संसार तापत्रय खोटा। व्यापार धंद्यांत आला तोटा ॥
मनास कंटाळा वीट मोठा । घेतला लोटा निघाले ॥ २८ ॥
चित्त झालें अति अस्थिर । वाटे प्रवासा जावें दूर ॥
सेवावा एकांत सुखकर । ऐसा विचार दृढ केला ॥ २९ ॥
जीव जैं पडे अतिसंकटीं । देव आठवे तदा कष्टीं ॥
मग तो भक्त करी हकाटी[1] । लागे पाठी देवाच्या ॥ ३० ॥
परी न लागतां दुष्कर्मा ओहटी । देवाचें नांव येईना ओठीं[2] ॥
मग सप्रेमता पाहूनि जगजेठी । संत भेटी करवितो ॥ ३१ ॥
तैसेंच त्या भक्ताचें जाहलें । पाहूनि संसारा अति कावले[3] ॥
स्नेही तयाचे वदते झाले । हितवचन वहिलें तें ऐका ॥ ३२ ॥
कांहो आपण शिरडीस जाना । समर्थ साईनाथांचें दर्शना ॥
करा कीं तयांस प्रार्थना । दयाघना त्या संता ॥ ३३ ॥
क्षणैक संत संगती लाधते । चंचल मन निश्चल होतें ॥
तात्काळ हरिचरणीं जडतें । मग अवघड तें परताया ॥ ३४ ॥
देशोदेशीचे लोक जाती । साईपदरजीं लोळती ॥
महाराजांच्या आज्ञेंत वर्तती । अभीष्ट[4] पावती सेवेनें ॥ ३५ ॥
ऐसी तयाची प्रसिद्ध कीर्ती । आबालवृद्ध सर्व जाणती ॥
तयांस येतां काकुळती । दुःखनिवृत्ती लाधाल ॥ ३६ ॥
शिरडी सांप्रत पवित्र स्थान । यात्रा वाहे रात्रंदीन ॥
तुम्हीही पहा अनुभव घेऊन । संतदर्शन हितकारी ॥ ३७ ॥
आवर्षणें उद्विग्न अकिंचन[5] । अवचित वर्षे विपुल घन
होतां भुकेनें व्याकूळ प्राण । पंचपक्वान्न वाढिलें ॥ ३८ ॥

---

१ नांवानें एकसारख्या हाका मारणें. नामस्मरण करणें. २ तोंडीं. ३ कातावलेले. ४ इच्छित मनोरथ. ५ दरिद्री.

तैसी स्नेहानें कथिली वार्ता । मानवली ती तया भक्ता ॥
अनुभव घ्यावा आलें चित्ता । धरिला रस्ता शिरडीचा ॥३९॥
आले गांवीं घेतलें दर्शन । पायीं घातलें लोटांगण ॥
तत्काल निवाले नयन । समाधान जाहलें ॥ ४० ॥
जें पूर्णब्रह्म सनातन । स्वयंजोती निरंजन ॥
पाहून ऐसें साईचें ध्यान । सुप्रसन्न मन जाहलें ॥ ४१ ॥
वाटलें पूर्वार्जित[1] सभाग्यता । तेणेंच हे पाय आले हाता ॥
चित्तास लाधली शांतता । निश्चिंतता दर्शनें ॥ ४२ ॥
उपनाम जयांचें साठे । अंतरीं निश्चयाचे मोठे ॥
गुरुचरित्र पारायण नेटें । नेमनिष्ठें आरंभिलें ॥ ४३ ॥
सप्ताह पूर्ण होतां निशीं । बाबा देती दृष्टांत त्यांशीं ॥
निजकरीं घेऊनि त्या पोथीशीं । अर्थ साठ्यांसीं समजावित ॥४४॥
स्वयें स्थित निजासनीं । समोर साठ्यांस बैसवूनी ॥
गुरुचरित्राची पोथी घेऊनी । निरूपणीं तत्पर ॥ ४५ ॥
बाबा ग्रंथावर्तन करिती । पुराणिकसे[2] कथा निरूपिती ॥
साठे श्रोतेपणें स्वस्थचित्तीं । सादर ऐकती गुरुकथा ॥ ४६ ॥
हें काय ऐसें उफराटें । विचारांत पडले साठे ॥
वाटलें तयांस आश्चर्य मोठें । कंठ दाटे प्रेमानें ॥ ४७ ॥
अज्ञान तमउशीसीं । ठेवूनिया मानेपाशीं ॥
घोरत पडले जे वासना कुशीसीं । त्यां जागविसी दयाळा ॥४८॥
पहा ऐसियाही समयासी । थापटोनियां आपणासी ॥
गुरुचरित्र पीयूषासीं[3] । पाजिलेंसी कृपाळा ॥ ४९ ॥

---

१ पूर्वपुण्याईच्या बळानें. २ पुराणिकांप्रमाणें. ३ अमृत.

असो ऐसा दृष्टांत पडतां । साठे जागृत झाले तत्वतां ॥
कळविती काकासाहेब दीक्षितां । साद्यंत वार्ता घडली ती ॥५०॥
म्हणती न कळे याचा अर्थ । जाणती एक बाबा समर्थ ॥
काय कीं न कळे त्यांचें मनांत । काका साद्यंत पुसा कीं ॥ ५१ ॥
पुनश्च पाठ सुरू करावा । कीं झाला तितकाच पुरा समजावा ॥
मनोदय बाबांचा पुसावा । तेणेंच विसावा ये मना ॥ ५२ ॥
मग काका बाबांप्रती । समय पाहूनी स्वप्न निवेदिती ॥
देवा आपण या दृष्टांतीं । काय साठ्यांप्रती जाणविलें ॥ ५३ ॥
सप्ताह ऐसाच सुरू ठेवावा । किंवा येथून पुरा करावा ॥
दृष्टांतार्थ स्वयें विवरावा । मार्ग दावावा तयांतें ॥ ५४ ॥
इतुकीच पायीं माझी विनंती । साठे मोठे भक्त भावार्थी ॥
कृपा व्हावी तयांवरती । पुरवावी आर्ती तयांची ॥ ५५ ॥
मग बाबा आज्ञापिती । होऊं द्या आणीक एक आवृत्ती ॥
वाचितांही गुरूची पोथी । भक्त होती निर्मळ ॥ ५६ ॥
या पोथीचें पारायण ॥ करितां होईल कल्याण ॥
परमेश्वर होईल प्रसन्न । भवबंधन सुटेल ॥ ५७ ॥
हें जव बाबांनीं केलें कथन । करीत होतों मी पादसंवाहन ॥
झालों अंतरीं विस्मयापन्न । वृत्ती स्फुरण पावली ॥ ५८ ॥
बाबा तरी हें ऐसें कसें । साठ्यांस फळती अल्पायासें ॥
माझीं गेलीं वर्षानुवर्षे । सातचि दिवसें फळ त्यांसीं ॥ ५९ ॥
एकचि पाठ गुरुचरित्राचा । केला साठ्यांनीं साता दिसांचा ॥
चाळीस वर्षांचा पाठ जयाचा । विचार तयाचा नाहींच कां ॥६०॥

---

१ (गुरुचरित्राचें) आवर्तन. २ स्पष्ट सांगावा. ३ पाय दाबणें.

एकास फळती सात दिवसें। एकाचीं निर्फळ सात वर्षें[1] ॥
वाट पाहें मी चातक प्रकर्षें। दयाघन हा वर्षेल कैं ॥ ६१ ॥
येईल कैं ऐसा दिवस । प्रसन्न होईल हा संतावतंस[2] ॥
फेडील माझिया मनीची हौस । देईल उपदेश मज काय ॥ ६२॥
भक्तवत्सल श्रीगुरू साई । पहा तयांची काय नवलाई ॥
मनीं वृत्ती उठली ते समयीं । तात्काळ त्यांहीं जाणिली ॥६३॥
ऐशाच अविद्येच्याही पोटीं । बऱ्या वाईट कोट्यानकोटी ॥
वासना उठती उठाउठी । तितुक्यांची दृष्टी तयांना ॥ ६४ ॥
मन चिंति तें वैरी न चिंती । हें तों सर्वांस ठावें निश्चिती ॥
इतर कोणीं जरी तें नेणती । महाराज ओळखती तात्काळ॥६५॥
परी ती माय अतिकृपाळ । पोटांत घाली निंद्य सकळ ॥
अनिंद्य पाहून प्राप्तकाळ। तितुक्यास चाळण देई ती ॥ ६६ ॥
तंव तें मनोगत जाणूनी । बाबा वदती मजलागूनी ॥
उठ त्या शाम्याकडे[3] जाऊनी । रुपये घेउनी पंधरा ये ॥ ६७॥
बैसे तयापासीं क्षणभर । गोष्टी बोला परस्पर ॥
दक्षिणा देईल ती घेऊन सत्वर । येई माघारा परतोन ॥६८॥
कृपा उपजली साईनाथा । दक्षिणेच्या करूनि निमित्ता ॥
म्हणती माग जा आतांचे आतां। रुपये मजकरितां शामाकडे ॥६९॥
झालियावरी ऐसी आज्ञा । बैसावया पुढें कोणाची प्राज्ञा ॥
बैसतां ती होईल अवज्ञा । घेऊनि अनुज्ञा ऊठलों ॥ ७० ॥

---

१ बाबांचें दर्शन झाल्यापासूनचीं सात वर्षें. २ संतचूडामणी. ३ माधवराव देशपांडे.

मग मी तात्काळ गमन केलें । शामरावही बाहेर आले ॥
होते नुकतेंच स्नान केलें । नेसत ठेले धोतर ॥ ७१ ॥

नुकतेंच झालें होतें स्नान । धूत वस्त्र परिधान करून ॥
होते घाळीत धोतराची चूण । मुखें गुणगुण नामाची ॥ ७२ ॥

म्हणती काय मध्येंच कोठें । मशीदींतून आलांत वाटे ॥
चर्येवरी कां चंचलता उमटे । असे एकटे कां आज ॥ ७२ ॥

या बसा मी आतांच न्हालों । हा पहा धोतर चुणीत आलों ॥
जातों देवावर पाणी घालों । समजा परतलों ऐसाच ॥ ७४ ॥

आपण करितां तांबूल भक्षण । तों मी सारितों पूजाविधान ॥
करूंमग वार्ता सावधान । समाधानपूर्वक ॥ ७५ ॥

माधवराव घरांत जाती । मग तेथेंच खिडकीवरती ॥
होती नाथभागवताची[1] पोथी । सहज हातीं घेतली ॥ ७६ ॥

यदृच्छेनें ग्रंथ उघडला । अकल्पित जेथें आरंभ केला ॥
प्रातःकाळीं जो अपूर्ण टाकिला[2] । वाचावयाला आला तोच भाग॥७७

अति आश्चर्य मना वाटलें । प्रातःकाळीं वाचन जें हेळेसिलें ॥
बाबांनीं तें संपूर्ण करविलें । वरी लाविलें नियमन ॥ ७९ ॥

नियमन म्हणजे नियमें वाचन । न होतां संपूर्ण निश्चित परिशीलन ॥
अपुरें टाकून नियमितोपासन[3] । स्थानापासून चळूं नये ॥ ८० ॥

आतां थोडीसी उपकथा । ओघास आली नये टाकितां ॥
श्रोतां परिसावी सादरता । या नाथभागवता संबंधें ॥ ८१ ॥

---

१ भागवताचें एकादश स्कंधावरील एकनाथ महाराजांची मराठी टीका. २ आळसानें वाचावयाचें टाकलें. ३ नेमाची उपासना.

तें हें नाथभागवत । गुरुभक्तिरसें परिप्लुत[१] ॥
साईकृपा पात्रभूत । नित्य दीक्षीत[२] वाचिती ॥ ८२॥
जगदुद्धाराचिया कारणें । ब्रह्मचाठायीं जें नारायणें ॥
पेरिलें तें मग नारद क्षेत्रीं त्याणें । बीज आणिलें कणसासी ॥८३॥
जया क्षेत्राची दशलक्षणी । केली संवंगणीं बादरायणीं ॥
शुकें परिक्षितीच्या खळ्यांत मळणी। केली निवडणी कणसांची॥८४॥
स्वामी श्रीधरें मारिलें हडप[३]। स्वामी जनार्दनें केलें माप ॥
रसभरित पक्वान्नें उमाप[४] । नाथप्रताप भोजन ॥ ८५ ॥
स्कंद एकादश त्यांतील जाण । भक्तिप्रेमसुखाची खाण ॥
तें हें बत्तीसखणीं[५] वृंदावन । नित्य वाचन दीक्षितां ॥ ८६ ॥
दिवसा तयाचें करिती निरूपण । रात्रौं वाचिती भावार्थ रामायण
हाही ग्रन्थ गुर्वाज्ञा म्हणून । जाहला प्रमाण दीक्षितां ॥ ८७ ॥
भक्तिसुखामृताचें सार । ज्ञानेश्वरीचा द्वितियावतार ॥
तो हा नाथांचा मूर्त उपकार । महाराष्ट्रांवर उदंड ॥ ८८ ॥
करोनिया प्रातःस्नान । नित्यनेम साईपूजन ॥
अन्य देवदेवतार्चन । नैवेद्य नीराजन उरकतां ॥ ८९ ॥
मग श्रोतां समवेत सविस्तर । पयःप्रसाद[६] आल्पाहार[७] ॥
सारोनि नित्यक्रमानुसार । पोथी सादर वाचिती ॥ ९० ॥
जया गोडिये सहस्त्र पारायणें । भगवत्परायण तुकारामानें ॥
केलीं भंडाऱ्यावर[८] एकांतपणें । ते गोडी कवणें वर्णावी ॥ ९१ ॥

---

१. पूर्ण भरलेलें २ श्री. हरी सिताराम दीक्षित. ३ सूप घेऊन झडपणें तें. ४ पुष्कळ. ५ बत्तीस अध्याय ज्याला आहेत असें. ६ दुधाचा नैवेद्य. ७ अल्प फलाहार. ८ या नांवाच्या डोंगरावर.

हा महा प्रासादिक दिव्य ग्रंथ । दीक्षित शिष्य निष्ठावंत ॥
म्हणोनि जीवांच्या उद्धारार्थ । साईसमर्थ आज्ञापिती ॥ ९२ ॥

जाणें नलगे वनाप्रती । भगवंत प्रगटे उद्धवगीतीं ॥
श्रद्धायुक्त जे पारायण करिती । भगवत्प्राप्ती रोकडी ॥ ९३ ॥

भारतीं संवाद कृष्णार्जुनाचा । त्याहून सरस हा कृष्णोद्धवाचा ॥
तो या भागवतीं उपदेश साचा । प्रेमळ वाचा नाथांची ॥ ९४ ॥

असो ऐसा हा प्रासादिक ग्रन्थ । ज्ञानदेव भावार्थदीपिका समवेत ॥
समर्थ कृपाळू साईनाथ । वाचवीत नित्य शिरडींत ॥ ९५ ॥

सखाराम हरी जोग । तयांस हा बाबांचा नियोग ॥
साठ्यांचे वाडियांत हा योग । भक्तां उपयोग हा मोठा ॥ ९६ ॥

प्रत्यहीं या ग्रंथाचें श्रवण । बाबा कित्येक भक्तांलागून ॥
श्रवण करविती कळवळून । भक्त कल्याण वांछेनें ॥ ९७ ॥

अगाध बाबांची अनुग्रहकुसरी । भक्तां उपदेशिती परोपरी ॥
भक्त जवळी वा देशांतरीं । बाबा अंतरीं सन्नीधची ॥ ९८ ॥

आपण जरी मशीदीं बसती । कोणाही कांहीं कार्य नेमिती ॥
तयासी देऊनिया निजशक्ति । करवूनि घेती तें कार्य ॥ ९९ ॥

बापूसाहेब जोगाप्रत । वाड्यांत पोथी वाचाया सांगत ॥
ते ती वाचीत नित्य नेमस्त । श्रोतेही येत ऐकाया ॥ १०० ॥

जोग ही दुपारा भोजनांतीं । नित्य जाऊनि बाबांप्रती ॥
चरण वंदूनि घेऊनि विभूति । आज्ञापन घेती पोथीचें ॥ १०१ ॥

---

१ या एकादशस्कंदास उद्धवगीत असें म्हणतात. २ ज्ञानेश्वरी. ३ आज्ञा. ४ शैली. ५ उदी, अंगारा. ६ पोथी वाचावयास आज्ञा.

कधीं वाचीत ज्ञानेश्वरी । कधीं ते नाथभागवतावरी ॥
पारायण मांडीत आनंदनिर्भरी । व्याख्यान करीत अर्थाचें ॥१०२॥
ऐसीं अनुज्ञा झालिया पाठीं । भक्त जे येती बाबांचे भेटी ॥
किति एकां पोथी ऐकावयासाठीं । उठाउठी पाठवीत ॥ १०३ ॥
कधीं सांगत संक्षिप्त गोष्टी । श्रोता जों सांठवी निजकर्णसंपुटीं ॥
तोंच बाबा म्हणत जा उठी । त्या पोथीसाठीं वाड्यांत ॥ १०४ ॥
श्रोता भावार्थी पोथीस जातां । निघावी पोथींतही ऐसीच कथा ॥
कीं जी पूर्वील कथेची दृढता । अर्थावबोधकता पूर्ण करी ॥ १०५ ॥
ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी । अथवा एकनाथाची वैखरी ॥
बाबांच्या कथेचाच अनुवाद करी । श्रोतयां नवल परी ही मोठी॥१०६
एकाद्या पोथीचा विवक्षित भाग । वाचावा ऐसा नसतांही नियोग ॥
पूर्व निवेदित गोष्टीचा सुयोग । पोथींत जोग वाचीत ॥ १०७ ॥
भगवद्गीता भागवत । मुख्यतः हेच दोन ग्रंथ ॥
भागवत धर्माचें सारभूत ॥ जोग हे नित्य वाचीत ॥ १०८ ॥
गीता ज्ञानेश्वरी टीका । जया नांव भावार्थदीपिका ॥
भागवत एकादशस्कंधनिका । परमार्थ भूमिका नाथांची ॥१०९॥
असो या नित्य क्रमानुसार । भागवत वाचनाचा प्रचार ॥
मींही तें वाचीं निरंतर । पडलें अंतर ते दिनीं ॥ ११० ॥
कथा एक अर्धी वाचिली । मंडळी मशीदीं जावया निघाली ॥
वाचतां वाचतां पोथी ठेविली । धांव मारिली मी तेथें ॥ १११ ॥
इच्छा ऐकाव्या बाबांच्या गोष्टी । बाबांच्यापरी आणीक पोटीं ॥
भागवत सोडूनि इतर कष्टीं । नाहींच तुष्टी तयांना ॥ ११२ ॥

येच अर्थीं नेटें पाटें । राहिलें भागवत वाचविलें वाटे ॥
ऐसें हें बाबांचें कौतुक मोठें । प्रेम लोटे आठवितां ॥ ११३ ॥

असो भागवती कथा संपली । उपकथाही एथें सरली ॥
माधवरावांची पूजा आटपली । स्वारी आली बाहेर ॥ ११४ ॥

अहो बाबांचा निरोप आहे । तोच मी घेऊन आलों पाहे ॥
' शामापासून पंधरा रुपये । दक्षिणा ये घेऊनी ' ॥ ११५ ॥

बैसलों होतों सेवा करीत । अकस्मात तुमचें स्मरण होत ॥
"उठ शामाकडे जा म्हणत । दक्षिणेसीं परत ये " ॥ ११६ ॥

"बैस म्हणाले तयांचें घरीं । विळंभर तयासवें वार्ता करी ॥
बोलून चालून परस्परीं । मग माघारीं तूं येईं" ॥ ११७ ॥

माधवराव जंव हें परिसत । झाले अत्यंत आश्चर्यचकित ॥
रुपयांऐवजीं नमस्कार सांगत । दक्षिणा म्हणत ही आमुची ॥११८॥

बरें असो एक झालें । पंधरा नमस्कार पदरीं बांधले ॥
परी वार्ता करावयास या कीं वहिलें । म्हणूनि म्हटलें तयांस ॥११९

काय गोष्टी सांगतां सांगा । फेडा कीं माझ्या श्रवण पांगा ॥
बाबांची निर्मळ यशगंगा । दुरितभंगा करू का ॥ १२० ॥

मग माधवराव म्हणती बैसा । या देवाचा खेळचि ऐसा ॥
तुम्हीही सर्व जाणतसां । क्षणैक विसावा घ्या बसा ॥ १२१ ॥

हें घ्या पान हा घ्या काथ । चुना सुपारी आहे डब्यांत ॥
हा मी आलों एका क्षणांत । टोपी डोक्यांत घालूनी ॥ १२२ ॥

---

१ नित्यपाठापैकीं वाचावयाची बाकी राहिलेला भाग. २ दक्षिणेसह.
३ पळभर

अगाध साईबाबांच्या लीला । किती म्हणून मी सांगू तुम्हाला ॥
आपण काय थोड्या देखिल्या । शिरडीस आल्यापासोनी ॥१२३
मी तो केवळ खेडवळ । आपण शहरवासी सकळ ॥
काय वानाव्या आपणाजवळ । लीला अकळ तयांच्या ॥१२४॥
येतों म्हणूनि घरांत गेले । देवास फूल पान वाहिलें ॥
तात्काळ टोपी घालून आले । बोलत बसले मजसवें ॥ १२५ ॥
काय देवाची अतर्क्य लीला । कोण जाणेल याची कळा ॥
अंत नाहीं यांच्या खेळा । खेळून खेळा निराळा ॥ १२६ ॥
काय तुम्ही विद्येचे भोक्ते । एकाहूनि एक ज्ञाते ॥
आम्हा गांवढळां[1] काय कळतें । चरित्र अकळतें बाबांचें ॥१२७॥
ते काय गोष्टी वार्ता न सांगती । आम्हापाशीं किमर्थ पाठविती ॥
त्यांची करणी तेच जाणती । मानवी वृत्ती नाहीं ती ॥ १२८ ॥
आलेंच आतां ओघावरीं । गोष्टही मज आठवली बरी ॥
करूं वार्ता कांहींतरी । वेळ साजरी करूं कीं ॥ १२९ ॥
प्रत्यक्ष आमुचे दृष्टीसमोर । कथितों येथें घडलेला प्रकार ॥
जया मनीं जैसा निर्धार । तैसा ते पार पाडिती ॥ १३० ॥
कधीं कधीं बाबाही किती । मनुष्याचा अंत पाहती ॥
भक्ति प्रेम कसास लाविती । तेव्हांच देती उपदेश ॥ १३१ ॥
"उपदेश" हा शब्द कानीं पडतां।स्मरली साठ्यांची गुरुचरित्र कथा ॥
सकृद्दर्शनीं जणु विद्युल्लता । चमकली चित्ता माझिया ॥ १३२ ॥
नसेल काही शामाची योजना । मशीदींतील मम चंचल मना ॥
स्थैर्य आणावयालागीं कल्पना । अघटित घटना बाबांची ॥१३३॥

१ गांवढेकरी.

असो ही जी उठली वृत्ती । तैसीच दावून ठेविली चित्तीं ॥
कथा श्रवणीं दुणावली आर्ती । तियेची पूर्ती संपादूं ॥ १३४ ॥

मग बाबांच्या गोष्टी वार्ता । थोडया थोडया सुरु होतां ॥
आनंद वाटूं लागला चित्ता । भक्त वत्सलता पाहूनी ॥ १३५ ॥

पुढें आणीक कथा सांगती । म्हणती एक देशमुखीण होती ॥
तियेच्या पहा आलें चित्तीं । संत संगती करावी ॥ १३६ ॥

ऐकून साईबाबांची कीर्ति । संगमनेरचे लोकां संगती ॥
आली बाई शिरडी प्रती । दर्शन प्रीती बाबांच्या ॥ १३७ ॥

खाशाबा देशमुखाची ही आई । नाम इयेचें राधाबाई ॥
निष्ठा धरून सांईचे पायीं । दर्शन घेई साईचें ॥ १३८ ॥

दर्शन घडलें यथासांग । गेला मार्गींचा शीण भाग ॥
जहला श्री चरणीं अनुराग । कार्यभाग आठवला ॥ १३९ ॥

होती तियेच्या मनीं आर्त । गुरु करावे साईसमर्थ ॥
करितील उपदेश यथार्थ । जेणें परमार्थ साधेल ॥ १४० ॥

बाई वयानें म्हातारी । निष्ठा अत्यंत बाबांवरी ॥
मिळावा उपदेश कांहींतरी । निर्धार अंतरीं हा केला ॥ १४१ ॥

बाबा जोंवरीं मजला स्वतंत्र । देती न एकादा कानमंत्र ॥
करिती न मज कृपापात्र । तोंवरी अन्यत्र जाणें ना ॥ १४२ ॥

व्हावा साईमुखींचाच मंत्र । घेतां इतरत्र तो अपवित्र ॥
श्री साई संताग्रणी पवित्र । अनुग्रह पात्र मज करो ॥ १४३ ॥

करूनि ऐसा अंतःकरणें । दृढनिश्चय त्या वृद्ध बाईनें ॥
वर्ज्य करूनि खाणें पिणें । घेऊनि धरणें बैसली ॥ १४४ ॥

आधींच वयानें म्हातारी । पोटांत अन्न नाहीं तिळभरी ॥
पाणीही पिईना घोटभरीं । श्रद्धा भारी उपदेशीं ॥ १४५ ॥
तीन दिवस अहर्निशीं । म्हातारी राहिली उपवाशी ॥
बाबा उपदेश देतील जे दिशीं । प्रायोपवेशी तोंवरी ॥ १४६ ॥
मंत्रोपदेश घेतल्याविणें । किमर्थ शिरडीचें जाणें येणें ॥
उतरल्या स्थळीं घेतलें धरणें । निर्वाण तीणें मांडिलें ॥ १४७ ॥
अन्न पान केलें वर्जन । ऐसें तप ते तीन दिन ॥
करितां कष्टली देशमुखीण । उदासीन बहु झाली ॥ १४८ ॥
माधवरावास विचार पडला । प्रकार हा तव नाहीं भला ॥
काय करावें या भवितव्याला। म्हातारी मरणाला भिईना ॥ १४९ ॥
मग ते जाऊनि मशीदिशीं । बैसते झाले बाबापाशीं ॥
नित्याचिया कुशलवृत्ताशीं । आदरेशीं ते पुसत ॥ १५० ॥
शामा आज काय विचार । ठीक आहेना समाचार ॥
तो नारायण तेली चळला फार। गजी अनिवार मजलागीं ॥ १५१ ॥
पाहोनि म्हातारीचा विचार । शामा आधींच कष्टी फार ॥
कैसें करावें तरी साचार । पुसे निर्धार बाबांसी ॥ १५२ ॥
हें काय गौडबंगाल देवा । खेळ आपुला इतरां न ठावा ॥
त्वां माणसें एकेक आणावीं गावां। आम्हा पुसावा विचार ॥ १५३ ॥
ती देशमुखीण वयातीत । अन्नापाण्याविरहित ॥
राहिली तीन दिवस उपोषित । तुजवरी हेत धरूनी ॥ १५४ ॥
म्हातारी ती परम हट्टी । तुझिया पायीं निष्ठा कट्टी ॥
तूं तो तीस न पाहसी दृष्टी । करितोसि कष्टी कां तिस ॥ १५५ ॥

१ अन्न व पाण्यावांचून व्रतस्थ बसणें. २ 'नारायण तेली' हें अंतस्थ एखाद्या दुष्टवृत्तीला अनुलक्षून श्रीसाईबाबा वरचेवर म्हणत असत.

आधींच तें शुष्क काष्ट। दुराग्रही महा खाष्ट ॥
अन्नावीण वाटतें स्पष्ट। प्राणचि नष्ट होतील ॥ १५६ ॥

म्हणतील म्हातारी गेली दर्शना। उपदेशाची धरून वासना॥
साईबाबांसी नाहीं करुणा। केलें मरणाधीन तिला ॥ १५७॥

बाबा घडो न दे ऐसा प्रवाद[1]। सांगोनि तिचा तिला हितवाद ॥
कराना का तिजवरीं प्रसाद। हा अप्रमाद[2] निरसा कीं॥ १५८॥

अंगांत नाहीं उरलें त्राण। कासावीस होतील प्राण ॥
म्हातारी ती पावेल मरण। तुम्हांस अपशरण[3] येईल ॥ १५९ ॥

म्हातारीचें दुर्धर व्रत। आम्हास पडली चिंता बहुत ॥
दुर्दैवें म्हातारी जालिया मृत॥ गोष्ट अनुचित घडेल ॥ १६० ॥

म्हातारीनें मांडिला त्रांगा। न करितां तिजवरीं कृपानुरागा ॥
दिसे न धडगत तिची मला गा। स्वमुखें सांगा तिस कांहीं ॥१६१॥

झाली सीमा अध्यायाची। पुढील श्रवणेच्छा श्रोतयांची ॥
पुढील अध्यायीं पुरेल साची। प्रेमरसाची ती जोड ॥ १६२ ॥

पुढें बाबांनीं प्रेमळपणें। उपदेश जो केला त्या म्हातारी कारणें॥
तयाचिया सादर श्रवणें। उठल धरणें[4] अविद्येचें ॥ १६३ ॥

हेमाड साईपायीं शरण। श्रोतयां घाली लोटांगण ॥
अल्पायासें भवतरण। कराया श्रवणतत्पर व्हा ॥ १६४ ॥

स्वस्ति श्री संतसज्जनप्रेरिते। भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते। मदनुग्रह नाम अष्टादशोध्यायः ॥

श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

---

१. लोकांत परस्परांत बोलणें. २. दोषारोप. ३ अपेश ४ निर्वाण.

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एकादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यामधून निदान एक तरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रितीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

## विनंति.

या पुढें श्री साईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व त्यामुळे जर ग्राहकांनां अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें या महिन्याचा अंक ग्राहकांचे हातीं जरा वेळानें पडत आहे त्याबद्दल ते क्षमा करतील अशी त्यांस विनंती आहे.

श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

## नोटीस

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नावानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.
श्रीसाईलीला आफीस ५-सेंट मार्टिन्स रोड बांद्रें, बी. बी. रेल्वे

शिर्डी येथील

श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हे पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भीष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जाणारीं पद्यें, व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनीं तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सीताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री साईलीला ऑफिस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,

सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर.

---

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून रा. आ. तर्खेड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रे येथें प्रसिद्ध केलें.

श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष २ रें. ] आषाढ शके १८४६ [ अंक ४ था.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमिह सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ दनेर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| महाराजांचे अनुभव | ... ... ... | १६७-१८ |
| श्री साईसच्चरित | ... ... ... | ३२१-३४ |


---

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एकादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यामधून निदान एक तरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रितीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

## विनंति.

या पुढें श्री साईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व त्यामुळे जर ग्राहकांनां अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही. पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खाली सही करणार यांच्या नांवानें खाली लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला आफिस ... सेंट मार्टिन्स रोड, दादर, बी. बी. रेल्वे.